फक्त सभासदांसाठी
वर्ष ४२वे, अंक ३रा ※ जुलै २०२४

सभा : मंगळवारी संध्या. ७.०० वा.
SNDT महाविद्यापीठ, रोटरी हॉल,
कर्वे रोड, पुणे ३८

# स्नेह सेवा
## मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६

※ अध्यक्ष ※
डॉ.राधा संगमनेरकर
मो. ९८८१३०७२७८

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

※ संपादक ※
श्री. मुकुंद गायधनी
मो.९४२२३०१८५१

## अध्यक्षीय

जगातील सर्वात मोठी लोकशाही भारत देश येथील २०२४ सालच्या निवडणुकांचे पडघम गेले तीन-चार महिने सुरू होते. एनडीए /मोदी सरकारला तिसऱ्या सत्राला शुभेच्छा. Distinction मिळवण्याच्या कुवतीच्या मुलाला पास होताना पाहून, पास होण्याचा आनंद घेणे हेच खरे. काय चुकले ? याचे मंथन होईलच, पण सर्वसामान्यांच्या नजरेतून काही मुद्दे मांडता येतील. अति उन्हाळ्यामुळे मतदानाची कमी टक्केवारी, विरोधी पक्षाचे खोटे प्रचार तंत्र, संविधान बदलणार, आरक्षण बंद करणार, असा सततचा प्रचार, प्रस्थापितांना विरोध. तसेच मोदी सरकारची लोककल्याणकारी कामे याचा प्रचार कमी पडला असे वाटते. 'देशाची सीमा बळकट करणे' 'बॉम्बस्फोटांची संख्या जवळजवळ नगण्य' राम मंदिर, तीर्थक्षेत्रांचा विकास हे सर्वजण अनुभवतात. ३७० कलम रद्द करणे, तिहेरी तलाक रद्द करणे, करोना काळात मोफत लसीकरण मोहीम प्रभावीरित्या राबवणे, अन्नधान्य सुरक्षा व गरजू लोकांना वितरण या सर्वांचा जनमानसावर पुरेसा प्रभाव पडला नाही की लोकांची स्मरणशक्ती क्षीण आहे कळत नाही. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर आरोप असलेल्या विरोधी पक्षातील नेत्यांचा भाजपमध्ये प्रवेश यामुळे पारंपारिक भाजपचा मतदार दुखावला गेला, कार्यकर्ते नाराज झाले. विरोधी नेता आला म्हणून त्याबरोबर त्यांचे कार्यकर्ते व त्यांना मत देणारी जनता यांचे भाजपच्या मतात रूपांतर झाले नाही. असो. ज्यांची नावे मतदार यादीतून वजा झाली त्यांनी विधानसभेच्या निवडणुका आधी प्रयत्नपूर्वक नोंदणी करून घ्यावी. प्रत्येक मत महत्त्वाचे असते हे वायकर विरुद्ध कीर्तीकर या लढतीत स्पष्ट होते... एवढे विचार मंथन पुरे!

**डॉ. राधा संगमनेरकर**

## कमला नेहरू उद्यान भेट

गुरुवार दि. ६ जून रोजी स्नेहसेवा सदस्यांनी कमला नेहरू उद्यानाला भेट दिली. ही भेट प्रा. श्याम भुर्के यांनी आयोजित केली होती.

हे उद्यान निर्माण करण्यासाठी त्या वेळचे पुण्याचे महापौर (कै.) श्री. बाबूराव सणस यांचे प्रयत्न, उद्यानाच्या 'कमला नेहरू' या नामकरणाचा इतिहास प्रा. भुर्के यांनी सांगितला. त्या वेळी पुण्याचा हा भाग तुरळक वस्तीचा असून फिल्म इन्स्टिट्यूट या उद्यानाचा उपयोग चित्रीकरणासाठी करीत असे. तेव्हा तेथे देव आनंद, मिथुन चक्रवर्ती, असरानी, जया भादुरी यांसारख्या कलावंतांवर चित्रीकरण झाल्याचे किस्से त्यांनी सांगितले.

या उद्यानाच्या एका विभागात ज्ञानकोशकार (कै.) श्री. व्यं. केतकर यांची समाधी आहे. ही समाधी या उद्यानात कशी आली तेही प्रा. भुर्के यांनी सांगितले. ज्ञानकोशकारांची जन्मजात बुद्धिमत्ता, भारतातील व परदेशातील शिक्षणासाठी करावा लागलेला संघर्ष, सर्व विद्यापीठांमधील ग्रंथालयांमध्ये त्यांनी घेतलेला रस, त्यातूनच निर्माण झालेली मराठी ज्ञानकोश करण्याची उर्मी, (कै.) सौ. शीलवतीबाईंशी झालेला विवाह व त्याचे सामाजिक पडसाद यांची माहिती प्रा. भुर्के यांनी रंजकपणे सादर केली. ज्ञानकोश निर्मितीमधील आर्थिक व इतर असंख्य अडचणींना तोंड देताना शीलवतीबाईंची खंबीर साथ त्यांना मिळाली. ज्ञानकोशाची विक्री हेही आव्हान त्यांनी यशस्वीपणे पेलले.

हे उद्यान पुण्याच्या सांस्कृतिक विश्वात महत्त्वाचे आहे. (कै.) पु. ल. देशपांडे, (कै.) वसंतराव देशपांडे येथून जवळच राहत असत. आजही एकोणीसशे पासष्टच्या युद्धात वापरलेल्या लढाऊ विमानापासून ते भारत फ्रान्स मैत्रीचे प्रतीक असलेल्या कलाकृतीपर्यंत अनेक समृद्ध संदर्भ येथे आहेत.

अनेक लोक येथे व्यायाम, मैत्री, निसर्गाचे सान्निध्य, हास्य क्लबमध्ये सहभाग अशा निमित्ताने येतात.

उद्यानात तीनशेपेक्षा अधिक वृक्ष असून साठ वर्षांचा पिंपळवृक्ष आणि कैलासपती या दुर्मिळ जातीचे सहा वृक्ष आहेत. औषधी वनस्पतींसाठी खास विभाग आहे. प्रा. भुर्के यांना यातील अनेक वृक्षांची इत्थंभूत माहिती आहे.

प्रा. भुर्के यांनी स्नेहसेवाच्या सभासदांकडून हास्य योगाचे अनेक प्रकार करून घेतले. त्यांच्या उत्साहात आणि आनंदात भर घातली.

आपल्या कविमनाच्या सभासद सौ. ऋचा सावरकर यांनी या उद्यानावर कविता सादर केली. (ती याच अंकात छापली आहे.) सौ. गीता भुर्के यांनी सर्वांकडून 'नाच रे मोरा' हे गीत म्हणवून घेतले.

डॉ. विद्याताई शर्मा पूर्वाश्रमी या परिसरात राहत असत. त्यांनी आभार मानले.

उद्यानात कार्यक्रम असल्याने अल्पोपहारात भेळ होती. कार्यक्रम संस्मरणीय झाला.

**सुधा जावडेकर**

## ऋचा सावरकर यांची कविता

उद्यानाच्या दारामध्ये उभे द्वारपाल दोन
जय विजय जणू कैलासपती च्या
वृक्षाचे आच्छादन...
लाल फुलांची आरास ही देही
गंध दरवळे दूर
सोबतीस हा विशाल पिंपळ
त्याच्या पानांची सळसळ...
फणस,अंबा पपई सिताफळ
आणिक ते जांभूळ
फळभाराने वृक्ष ही लवता
जणू पक्ष्यांचे गोकुळ....
लाल पांढरा चाफा बहरे
आसमंत धुंदावे
बागेमध्ये निवांत फिरती
पक्षी गणांचे थवे....
औषधी वनस्पती इथे लावल्या
कारंजे मध्यावर
तुषार त्याचे उडता अंगावर
मन मोरा येई बहर....
रवि बिंब डोकवे झाडांच्या आडून
सूर्य स्नान ही घडे
मऊसर हळव्या हिरवळीवरती
चालता, मध्येच पाऊल अडे....
आम्रतरुवर हिरव्या कैऱ्या झुल्यावर
झुलती ही हळूवार
लांबून ही बघता त्या कैऱ्याना
बालपण आठवे फार....
धनेश, पोपट, साळुंक्या ही
रोजच येथे येती
त्यांच्या संगे आता आमची
जमली येथे गट्टी.... शरीर पिकले पण मने तरुण ही
झडती गप्पांचे येथे अड्डे
क्षुधाशांती साठी येथे ही
खाऊचे ठेले सजले....
माय मराठी शब्द कोष ज्यांनी
लिहिला एका हाती
ते केतकर कोपऱ्यात एका
घेती चिर विश्रांती...
कमलेच्या उद्यानी कमल खिलखिले
उत्फुल्ल जाहले चेहेरे
कमल गंध हा चहू बाजूंनी
आसमंती दरवळे....

**ऋचा सावरकर**

## एचपीव्ही व्हॅक्सिनेशन शिबीर

९ जून २०२४ रविवारी चिन्मय मदर अँड चाईल्ड केअर येथे सर्वाइकल कॅन्सर प्रिव्हेन्शन कॅम्प, स्नेहसेवा व मैत्री चॅरिटेबल सोसायटी, यांच्या सौजन्याने आयोजित केला होता. सात एप्रिल रोजी शुभारंभ होऊन त्यात सहभागी मुलींना दुसरा डोस देण्यात आला. १८ मुलींना वॅक्सिंनचा दुसरा डोस देण्यात आला. तसेच नवीन २८ मुलींना पहिला डोस देण्यात आला.

माजी अध्यक्षा श्रीमती छाया काळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. स्नेहसेवेचे १० सदस्य उपस्थित होते. सकाळी नऊ ते ११ या वेळेत शिबिर अतिशय शिस्तबद्ध स्वरूपात पार पडले. त्यानंतर सर्व सहभागी मुलींना व सदस्यांना अल्पोपहाराची सोय केली होती

**डॉ. सौ राधा संगमनेरकर**

## न्यायालातील गमती जमती:
## ॲड. विद्याधर शिंत्रे–११ जून २०२४ :

कोर्टामधले वातावरण आपल्याला वाटते तितके गंभीर असत नाही, असा खुलासा करून ॲड. विद्याधर शिंत्रे यांनी त्यांच्या ५० वर्षांच्या वकीलीच्या कारकिर्दीमधले त्यांचे अनुभव मांडले. वकील, न्यायाधीश, पक्षकार या कोर्टामधल्या पात्रांच्या व्यक्तिरेखा त्यांनी श्रोत्यांसमोर उभ्या केल्या.

तरूण वकील असताना लोणावळा चिक्की च्या मालकाने

त्यांना एका केससाठी रु. २५ फी शुभशकून म्हणून दिली, आणि ती खरेच तशी ठरली. त्याच काळात सदाशिव पेठेतील एका कुटुंबातील भाऊ-भाऊ वाटपाचा दावा लढत होते. घरी त्यांचे संबंध चांगले होते. ते दोघे एकत्र कोर्टात येत-जात. मग कोर्टात केस का? तडजोड करून मिटवत का नाही? असे विचारले तर पुढच्या पिढीसाठी कोर्टाचा निर्णय हवा आहे असे त्या भावांनी सांगितले. त्या भावांसाठी कोर्टातली लढाई हा आनंदाचा विषय होता.

कायद्याचे पालन करणारे नागरिक पक्षकार म्हणून भेटले. भाडेकरूने भाडे थकविले तर पूर्ण १ महिन्याची नोटीस द्यावी लागते. परंतु १ दिवस कमी मुदतीची नोटीस त्यांनी पक्षकार मालका तर्फे दिली, ज्यामुळे मालाकातर्फे ताबा मिळविण्याची केस टिकली नसती. तरीही भाडेकरूने किल्ली परत देवून ताबा दिला. कायदा पाळणे हे सोपे नसते याबद्दल त्यांनी भारतरत्न सम्मानित डॉ काणे यांची गोष्ट सांगितली. डॉ काणे गिरगाव मध्ये एल.आय.सी. च्या ज्या जागेत भाडेकरू होते, ती परत करायची आहे असे त्यांनी एल.आय.सी. ला कळविले. एल.आय.सी. च्या ऑफिसर ने काही वैयक्तिक लाभ मिळण्याच्या अपेक्षेपोटी टाळाटाळ केली. एल.आय.सी. च्या अध्यक्षांना हस्तक्षेप करण्याची विनंती करावी लागली.

याउलट काही पक्षकार हिरीरीने लढतात, आणि विरुद्ध पक्षकाराचे नुकसान करण्याचा हर तऱ्हेने प्रयत्न करतात. एक नवरा-बायको दाम्पत्याकडे भाड्याची जागा होती. दोघांमध्ये वाद आणि नंतर घटस्फोटाचे प्रकरण झाले. त्या नवऱ्याने परस्पर जागा मालकांना परत देवून टाकली. पत्नीला ती जागा परत मिळवण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागले.

पक्षकाराने फी दिली नाही तर वकिलांना जरी त्यासाठी कोर्टात दावा करता येत असला तरी फी मिळण्यासाठी कायदेशीर कार्यवाही वकीलाने करायची नाही असा प्रघात आहे. ॲड. शिंत्रे यांना मात्र एकदा एका बदमाश पक्षकाराविरुद्ध पाउले उचलावी लागली. झाले असे की पक्षकाराने बिल मिळूनही फी दिली नाही, पण त्याबद्दलचे टी.डी.एस. प्राप्तीकर विभागाकडे नोंदवले. ही तर फार मोठी चूक होती, म्हणून ॲड. शिंत्रे यांचे एक पत्र मिळताच त्याने फी पाठवून दिली.

बँकेचे वकील म्हणून बँकेतर्फे कर्ज वसुलीची केस दाखल केल्यावर एका कर्जदाराने ॲड. शिंत्रे यांच्या मित्रामार्फत केस बद्दल मदत करण्याची विनंती केली. विरुद्ध पक्षकाराबरोबर संपर्क ठेवणे नैतिकतेच्या आणि वकिलांना लागू असलेल्या आचारसंहितेच्या विरुद्ध आहे. त्यांनी मित्राला सुयोग्य उत्तर दिले.

ज्या न्यायाधीशापुढे केस चालवायची त्या न्यायाधीशांचे निरीक्षण अत्यंत बारकाईने केस चालविण्यापूर्वी केले पाहिजे. औरंगाबादमध्ये असे करताना त्यांच्या लक्षात आले की न्यायाधीश दुपार होत असताना चिडचिड करत आणि दुपारच्या सुट्टीनंतर सौम्य होत. चौकशी केल्यावर कळले की न्यायाधीशांना डायबीटीस असल्यामुळे तसे होत होते. यावरून ठरविले की कोर्टात कोणत्या वेळेस युक्तिवाद मांडायचा.

युक्तीवाद कोर्टापुढे मांडताना न्यायाधीश नाराज किंवा अपमानित होणार नाहीत याची विशेष काळजी घ्यावी लागते. नाहीतर चांगली केस असूनही अपयश हाती लागते.

ॲड. शिंत्रे यांनी आवर्जून सांगितले की भा.ज.प. आणि मित्र पक्षांचे ४००हून अधिक आमदार निवडून आले तर संविधान धोक्यात येईल ही भीती अनाठायी होती, कारण १९७१ साली केशवानंद भारती यांच्या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिलेला आहे की संविधानाच्या मूळ रचना अबाधित असेल. त्यामुळे संसद कधीही ती रचना बदलेल असे कायदे करू शकणार नाही.

ॲड. शिंत्रे यांची ओळख प्रा. रवींद्र कोठावदे यांनी करून दिली. डॉ नीलिमा भडभडे यांनी आभार मानले.

**डॉ. नीलिमा भडभडे**

## 'अग्नि मिसाईल' मधील सहभाग

मंगळवार दि. १८ जून २०२४ रोजी शिरीष देशमुख यांचे 'अग्नि मिसाईल' मधील सहभाग या विषयावर व्याख्यान झाले. श्री. माधव बांदिवडेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. देशाच्या संरक्षणासाठी शस्त्रनिर्मिती मध्ये तांत्रिक प्रगतीच्या वाटचालीत श्री. शिरीष देशमुखांचा गेल्या तीन दशकांहून अधिकचा सहभाग आहे. ते स्वत: ज्ञान प्रबोधिनीत शालेय शिक्षण घेऊन इलेक्ट्रॉनिक्स इंजीनिअर झाले आहेत. एल.एन.टी येथे मोठ्या प्रकल्प उद्योगात सरुवातीचा अनुभव घेऊन त्यांनी स्वत:ची प्रकल्पनिर्मिती, संशोधक व उद्योजक संस्था कार्यान्वित केली. सुरुवातीपासून त्यांना संरक्षण संशोधन व विकास संस्थांशी आधुनिक शस्त्रनिर्मिती प्रकल्पांमध्ये विकसक पुरवठादार म्हणून सक्रीय सहभागाची संधी मिळाली. अग्नी क्षेपणास्त्र प्रकल्प हा त्यातील महत्त्वाचा टप्पा. या निमित्ताने श्री. शिरीष देशमुखांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, मनोहर पर्रीकर इत्यादी दिग्गजांचा वैयक्तिक कार्यसहभाग लाभला आहे.

ही मोलाची ओळख श्रोत्यांना लक्षवेधक व प्रभावीत करायला बोलकी ठरली.

श्री. शिरीष देशमुखांनी श्रोत्यांचा तंत्रज्ञान किंवा अन्य क्षेत्रातील अनुभवाचा अंदाज घेऊन भाषणाची सुरुवात केली. सुरुवात सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेत, शस्त्र विकसनातील महत्त्वाचे पैलू, प्रक्रिया व शस्त्रांचे विविध समाविष्ट व पूरक भाग, त्यांच्या व्याख्या, संक्षिप्त नावे व त्यांचे महत्त्व समजावून केली. त्यानंतर शस्त्रांच्या विकास,

आरेखन, शस्त्र जुळवणी, वाहतूक आणि प्रत्यक्ष चाचणी इत्यादी साठी आवश्यक अचुकता व बारकावे समजावले. त्या अनुषंगाने श्री. शिरीष देशमुखांच्या संशोधनात वाटा व त्यावेळच्या अनुभवांचे वर्णन केले. विविध मिसाईल उदा. नाग, आकाश, त्रिशूल, पृथ्वी, अग्नी इ. प्रकल्पांमध्ये देशमुखांचा प्रत्यक्ष सहभाग व त्यातील किस्से यांनी भाषण खूपच मनोरंजक व प्रभावी झाले. याक्षेत्रात भारताचे जगातील महत्त्वाचे स्थान ही सुद्धा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. व आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. भाषणाच्या अखेरीस श्रोत्यांच्या शंका व अधिक माहितीची मागणी, त्यांची कुतुहल व समाधान दर्शवणारी होती.

भाषणानंतर श्री कौस्तुभ भडभडे यांनी यथोचित आभार प्रदर्शन केले.

**मुकुंद गायधनी**

## संस्कृत सुभाषिते

संस्कृत सुभाषिते आपण सर्वांनी, आपल्या लहानपणी मुखोद्गत केली होती. अतिशय सुंदर व आशयघन अशी ही वचने आजही आपल्याला आनंद देतात. सध्या 'सकाळ'मध्येही येत आहेत. चला तर मग! अगदी सोपी व नेहमी कानावर पडणारी अशी काही सुभाषिते आठवूया.

१) यस्य नास्ति स्वयं प्राज्ञा, शास्त्रौ तस्य करोति कीं।
लोचनाभ्यां विहीनस्य दर्पण: कीं करिष्यति।।

ज्याप्रमाणे दृष्टी नसलेल्या व्यक्तीस आरशाचा काय उपयोग तसेच बुद्धीहीनास शास्त्र शिकवण्याचे काय प्रयोजन?

२) अति परिचायाद्वज्ञा संततगमनात अनादरो भवति।
मलये भिल्ल पुरंध्री, चंदन तरू काष्ठंच कुरूते।।

अति परिचयाने उपेक्षा व वारंवार जाण्याने अनादर होण्याची शक्यता असते. मलय पर्वत, जेथे चंदनाची विपुल झाडे आहेत तेथील भिल्ल स्त्रिया चंदनाचेच सरपण वापरतात.

पिकते तेथे विकत नाहीत हेच खरे!

३) कमले कमला शेते, हर: शेते हिमालये।
क्षीराब्धौच हरि: शेते, मन्ये मत्कुणशंकया।।

संस्कृत कवी मिस्कील ही होते बरं का! त्यांची ही अफलातून कल्पना पहा... लक्ष्मी कमळांत... शंकर हिमालयांत अन् विष्णू क्षीरसागरात कां बरे झोपत असतील? त्यांच्या घरात काही उपद्रवी कीटक असतील काय?

**डॉ. विद्या शर्मा**

## आय लव्ह माय इंडिया

आले बाई एकदाची इंडियात
ठेवलंय काय मेलं त्या परदेशात!
जाईन म्हणते एकदा तुळशीबागेत
दुपारभर मजेत रेंगाळायला
गाडीवरच्या रंगीबेरंगी बांगड्या बघून
भूतकाळात रमायला
किती मजा वाटते ना
लक्ष्मी रोडवरच्या गर्दीत मिसळायला
खरेदी नाही केली तरी
विंडो शॉपिंग करायला
अहो, चितळ्यांकडची चक्कर
कशी बरं विसरेन?
तिथूनच तर बाकरवडी घेऊन
नातवंडांना परदेशात पाठवेन
नुसत्या आठवणीनं पाणी सुटलंय तोंडाला
तर मग जायलाच हवं ना
गाडीवरची पाणीपुरी
मिटक्या मारत खायला
सख्यांसोबत किटी पार्टी
उद्याच हवी ठरवायला
चमचमीत वडे भजी खात
जोरजोरात खिदळायला
आई, बाबा, काका, काकू
जाईन सगळ्यांना भेटायला
दादा, वहिनी, ताईशी
सुखदु:खाच्या चार गोष्टी करायला
पहिल्या पावसानंतर दरवळेल
इथल्या मातीचा गंध
घेईन भरून तनामनात
रोम रोम होईल धुंद
जायलाच हवं पहाटे उठून
सारसबागेतल्या गणपतीला
सगळ्यांचा तारणहार तोच तर आहे
याची खात्री आहे मला
सारं कसं आखीव रेखीव
नीटनेटकं असूनसुद्धा
परदेशात मेलं करमतच नाही
इथल्या मातीशी नाळ
तोडू म्हणता तुटत नाही

**उज्ज्वला नाईक**